महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या प्रशासकीय कामकाजावरील खर्चासाठी निधी वितरीत करणेबाबत...
(लेखाशिर्ष २२३० ६१२७) (रुपये २ कोटी १० लाख)

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन ज्ञापन क्रमांक : कौविउ-२०२२/प्र.क्र.११७/कौशल्य -१**
२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०२ ऑगस्ट, २०२२

वाचा :-१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक कौविका-२०१०/ (१७७/२०१०)/व्यशि-५, दि. २९/१२/२०१०.
२) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दि. १७/०४/२०१५.
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२२/प्र.क्र.४३/अर्थसं-३. /दिनांक ०४ एप्रिल, २०२२

ज्ञापन :

राज्यात कौशल्य विकासाशी निगडीत विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी "महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी" ही "नोडल एजन्सी" म्हणून कार्यरत आहे.

२. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात संस्थेच्या कामकाजावरील खर्चासाठी मागणी क्रमांक झेडए-२, २२३० कामगार व सेवायोजन, (०१) (०९) महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था (२२३० ६१२७), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली रु.१०.०० कोटी (दहा कोटी फक्त) इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

३. वित्त विभागाच्या सं.क्र.२ व ३ येथील शासन निर्णय व परिपत्रकास अनुसरुन उपरोक्त रु. १०.०० कोटी इतक्या अर्थसंकल्पित तरतूदीमधून रु.२ कोटी १० लाख (दोन कोटी दहा लाख फक्त) इतका निधी वितरीत व खर्च करण्यास या शासन ज्ञापनान्वये मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर निधी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांना तात्काळ उपलब्ध करुन देऊन या संदर्भातील लेखे अद्ययावत ठेवावेत. उपरोक्त निधी ज्या कारणास्तव उपलब्ध करुन देण्यात आला आहे त्याच कारणास्तव खर्च करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी,मुंबई यांची राहील. तसेच प्रत्यक्ष खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) विहित कालमर्यादेत सादर करण्याची दक्षता आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांनी घ्यावी.

५. या ज्ञापनाद्वारे वितरीत करण्यात आलेला निधी "मागणी क्रमांक झेडए-२, २२३० कामगार व सेवायोजन, (०१) (०९) महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था (२२३० ६१२७), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये खर्ची टाकण्यात यावा.

६. याकरिता आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय,नवी मुंबई यांना "नियंत्रण अधिकारी", सहायक संचालक, लेखा यांना "आहरण व संवितरण अधिकारी" तसेच "मुख्य कार्यकारी अधिकारी", महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांना "नोडल एजन्सी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

७. सदर निधी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी,मुंबई यांचेकडे वर्ग करुन याबाबतचे लेखे स्वतंत्र व अद्ययावत ठेवावेत. उपरोक्त निधी ज्या कारणास्तव उपलब्ध करुन देण्यात आला आहे त्याच कारणास्तव खर्च करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांची राहणार असून त्यांनी प्रत्यक्ष खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) विहित कालमर्यादेत शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

८. उक्त निधी खर्च करताना वित्त/ नियोजन व या विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने खरेदी विषयक वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदींचे/ मार्गदर्शक सूचना/अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करावे.

९. सदरहू ज्ञापन वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८,दिनांक १५ मे २००९ अधिकारांस प्रशासनिक विभागास दिलेल्या अधिकारांस अनुसरुन तसेच वित्त विभाग परिपत्रक ०४. एप्रिल, २०२२ मधील तरतुदींस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२२०८०४१२५१०४२८०३ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUVARNA S KHARAT

Digitally signed by SUVARNA S KHARAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILL EMPLOYMENT ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=cdf8435b14113ef43d22f63f448b2db4109f1aa98eda5f3b78841f6bc40a437b, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=35F57024DD03B25B43EA1F6F39E191F897508AEF3C68A8BD9209A39DD656B14C, cn=SUVARNA S KHARAT
Date: 2022.08.04 12:56:11 +05'30'

**( डॉ. सुवर्णा खरात )**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
४. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे.
५. अपर कोषागार अधिकारी, उप कोषागार कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई,
६. कार्यासन अधिकारी, प्रशा-३ कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. निवड नस्ती (कौशल्य -१), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.